प्रसिध्दी पत्रक दिनांक. ०१/१२/२०२३

# विद्युत मिटर नावावर करून देण्यासाठी लाच मागुन स्विकारणारे महावितरणचे दोन कर्मचारी यांचे विरूध्द गुन्हा

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | ॲन्टी करप्शन ब्युरो, परभणी |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता. | १.ज्ञानेश्वर सखाराम लहाने वय ३९ वर्षे, पद कनिष्ठ कार्यालयीन सहायक, झोन ३ महावितरण शहर उप विभाग कार्यालय,परभणी रा.पोस्ट कॉलोनी, परभणी. २. जयश्री तुळशीराम चव्हाण, वय ३५ वर्षे, पद बाह्यस्त्रोत तंत्रज्ञ, झोन ३ महावितरण शहर उप विभाग कार्यालय,परभणी. राहणार विवेकानंद नगर, सेलू, ता. सेलू,जि.परभणी |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,६००/- रू |
| लाचेची स्विकारली रक्कम | १,६००/- रू |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी घर विकत घेतले आहे. जुन्या मालकाचे नावे असलेले विद्युत मीटर हे तक्रारदार यांचे नावे होण्यासाठी त्यांनी ऑनलाइन अर्ज व त्याची फिस भरून त्याची प्रिंट झोन ३ परभणी येथे गेले असता तेथे आलोसे क्र ०२ यांनी तक्रारदार यांचेकडून ऑनलाइन अर्जाची प्रत स्विकारून त्यावर पोच देऊन तुमचे कामाला ३ महिने लागतील. जर तुम्हाला तुमचे काम लवकर करून घ्यायचे असेल तर खर्च लागेल असे म्हणून लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी एसीबी कार्यालय परभणी येथे तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन दि.३०/११/२०२३ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही मध्ये आलोसे क्रमांक २ यांनी आलोसे क्रमांक १ यांचे सांगण्यावरुन १६००/- रु लाचेची मागणी पंचासमक्ष केली. दि.०१/१२/२०२३ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई मध्ये आलोसे क्रमांक ०१ यांचे सांगणेवरुन आलोसे क्रमांक ०२ यांनी त्यांचे कार्यालयामध्ये तक्रारदार यांचे कडून १६००/- रु लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारली. त्यावरुन आलोसे क्रमांक ०१ व ०२ यांना ताब्यात घेतले असून पोलीस स्टेशन कोतवाली, परभणी येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| सापळा पथक | सदरची कार्यवाही मा.डॉ.राजकुमार शिंदे, पोलीस अधिक्षक,ला.प्र.वि. नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली सापळा कार्यवाही श्री. अशोक इप्पर, पोलीस उप अधिक्षक,एसीबी,परभणी , श्री.सदानंद वाघमारे, पो.नि.लाप्रवि परभणी तसेच सापळा कार्यवाही पथक पोह/निलपत्रेवार,सिमा चाटे, पोशि/अतुल कदम, चापोह/जे.जे.कदम ॲन्टी करप्शन ब्युरो परभणी. |
| तपास अधिकारी | श्री. सदानंद वाघमारे, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,परभणी |

ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणाऱ्या इसमाविरूध्द तक्रार असल्यास अगर भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास ॲन्टी करप्शन ब्युरो परभणी येथे संपर्क साधावा.

| संपर्क पत्ता :- ॲन्टी करप्शन ब्युरो, शनिवार बाजार,नानलपेठ, परभणी. | |
|---|---|
| ☎ 02452-220597 टोल फ्री :- 1064 | ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन acbmaharastra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उप अधीक्षक 9850483337 |
| spacbnanaded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook : Acb Parbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Instagram : acbparbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी